## आदेश नि. क्र. ०५ खाली
(दिनांक: ११.०२.२०१९)

१. अर्जदार/वादीने सदरचा अर्ज हा गैरअर्जदार/प्रतिवांदीविरूध्द तात्पुरता मनाई हुकुम मिळण्यासाठी दाखल केलेले आहे.

२. अर्जदार/वादीच्या अर्जातील कथने हे खालील प्रमाणे आहेत:

अर्जदार व गैरअर्जदार क्र. १ व २ हे मौजे सुकळी ता.उमरखेड जि.यवतमाळ येथील रहिवाशी आहेत. अर्जदार हा शेतकरी असुन अर्जदाराचे सुकळी ग्रा.पं.अंतर्गत घर आहे. अर्जदाराच्या कुटुंबामध्ये अर्जदाराची वयोवृध्द आई असुन आईस दम्याचा त्रास आहे. अर्जदाराच्या घराच्या उत्तर बाजुने गैरअर्जदार क्र. १ ची पिठ गिरणी आहे. त्यास गैरअर्जदार क्र. २ याने पिठ गिरणी चालविण्याचा परवाना दिलेला आहे व गैरअर्जदार क्र. ३ याने पिठ गिरणी चालविण्यासाइी विदयुत कनेक्शन दिले आहे.

३. अर्जदार हा अतिशय गरीब असुन वाद गिरणीच्या दक्षिण बाजुस अर्जदाराचे घर आहे. अर्जदाराच्या आर्थिक परिस्थितीनुसार अर्जदाराचे टिनपत्राचे व विटामातीचे घर आहे व त्याचे बाजुस गैरअर्जदार क्र. १ यांची अवैध वाद पिठ गिरणी आहे. गैरअर्जदार हा दिवसरात्र वाद पिठगिरणी चालवितो. गैरअर्जदार हा पिठ गिरणी चालवितांना मुंबई दुकान अधिनियमांचे उल्लंघन करीत असतो. यामुळे अर्जदाराच्या कुटुंबास सतत वाद पिठ गिरणीचे आवाजामुळे व जमीनीस वाद पिठगिरणीच्या बसणा—या हाद—यामुळे अर्जदाराच्या घरातील भांडयांना हादरे बसुन भांडे पडत असतात, टिन वाजत असतात व अर्जदाराच्या घराच्या भिंतीला वाद पिठ गिरणीच्या धक्क्यामुळे भेगा पडल्या आहेत. अर्जदाराचे घर त्या ठिकाणी पुर्वीपासुनच आहे. गैरअर्जदार याने नंतर त्या ठिकाणी वाद पिठ गिरणी टाकली आहे. वाद गिरणीच्या ध्वनी प्रदुषणामुळे अर्जदाराची आजी आजारी पडुन दि. ०९.०६.२०१८ रोजी मरण पावली आहे.

४. गैरअर्जदाराच्या वाद पिठ गिरणीमुळे अर्जदाराचे संपुर्ण कुटुंब आजारी पडले आहे. गैरअर्जदाराच्या पिठ गिरणीच्या कर्कश आवाजामुळे व त्रासामुळे अर्जदाराचे कुटुंब उशीरापर्यंत झोपु शकत नाही व गैरअर्जदार सकाळी ४.०० वाजता पिठ गिरणी चालु करीत असल्यामुळे अर्जदाराच्या कुटुंबाची झोप होत नाही. बहुतेकवेळा दिवसा विदयुत पुरवठा बंद असल्यामुळे गैरअर्जदार रात्ररात्र पिठ गिरणी चालवितो. त्यामुळे सुध्दा अर्जदाराचे कुटुंब झोपु शकत नाही. गैरअर्जदाराने पिठ गिरणीच्या धुराडयाची कुठल्याही प्रकारची व्यवस्था केलेली नाही त्यामुळे पिठाचा कचरा अर्जदाराचे घरात येवुन अर्जदाराचे संपुर्ण कुटुंब आजारी पडले आहे. अर्जदाराला राहण्याची दुसरी कुठलीही पर्यायी जागा नाही. अर्जदाराने गैरअर्जदाराची पिठ गिरणी बंद करावी म्हणुन जिल्हाधिकारी साहेब यवतमाळ यांच्याकडे दि. ०२.०४.२०१८ रोजी, तहसिलदार साहेब,उमरखेड यांचेकडे दि. १९.०३.२०१८ रोजी व उपअभियंता उमरखेड यांचेकडे दि. ०६.०३.२०१८ रोजी अर्ज केले. परंतु जिल्हाधिकारी यवतमाळ व उपविभागीय अधिकारी साहेब, उमरखेड यांनी फौजदारी प्रक्रीया संहीताचे कलम १३३ नुसार अर्जदाराच्या अर्जाची कोणत्याही प्रकारची दखल घेतली नाही. त्यामुळे अर्जदाराने सचिव,ग्रा.पं.सुकळी यांचेकडे वाद पिठगिरणीच्या परवान्याच्या ठरावाची प्रत मागीतली परंतु त्यांनी ठरावाची प्रत दिली नाही. गैरअर्जदार क्र. ३ याने किती व्होल्टेज कनेक्शनचा परवाना दिला याबाबतची माहीती अर्जदाराने मागीतली परंतु त्यांनी अशी कुठलीही माहीती अर्जदाराला पुरविली नाही. त्यामुळे अर्जदार माहितीच्या अधिकारात राज्य माहिती आयुक्त अमरावती यांचेपर्यंत माहिती मिळविण्याकरीता गेला परंतु त्यांनी कुठलीही माहिती दिली नाही व गैरअर्जदार क्र. १ यांची वाद गिरणी बंद केली नाही. त्यापुर्वी अर्जदाराने गैरअर्जदाराच्या त्रासाला व धमक्यांना कंटाळुन गैरअर्जदाराविरूध्द दि. १०.०१.

२०१८ रोजी सकाळी ११.०० वाजता गैरअर्जदाराने अर्जदाराला शिवीगाह केली व जिवाने मारून टाकण्याची धमकी दिली त्याबाबतचा जबानी रिपोर्ट दिला त्यावरून पोलीस ठाणे उमरखेड यांनी गैरअर्जदार क्र. १ विरूध्द प्रतिवृत्त क्रमांक १५/२०१८ नुसार कलम १०७ व ११६ नुसार प्रतिबंधात्मक कारवाई केली. परंतु पिठ गिरणी बंद केली नाही. त्यामुळे अर्जदाराने मा. न्यायालयात सदरचा दावा दाखल करावा लागला आहे. परंतु दाव्याचा निकाल लागण्यास बराच कालावधी लागणार असल्यामुळे त्यामध्ये तात्पुरता मनाई हुकुम मिळण्यासाठी सदरचा अर्ज दाखल केले आहे.

५. वादीचे पुढे असे कथन आहे की, वाद पिठ गिरणी हा लघु उदयोग आहे. महाराष्ट्र शासनाने लघु उदयोग चालु करतांना व त्यास परवाना देतांना व विदयुत कनेक्शन जोडतांना अनेक प्रकारचे नाहरकत प्रमाणपत्र घेवुन व वेगवेगळया कार्यालयाचे प्रमाणपत्रे घेवुन आजुबाजुच्या शेजा—यांचे नाहरकत प्रमाणपत्र घेवुन पिठ गिरणीचा व्यवसाय चालु करण्याचे बंधने घातली आहेत दृ परंतु गैरअर्जदार क्र. २ व ३ यांनी परवाना व विदयुत जोडणी देतांना कायदयातील तरतुदींचे पालन केले नाही. वस्तीमध्ये १० एच.पी.चे कनेक्शन देता येत नसतांना गैरअर्जदार क्र. ३ याने गैरअर्जदार क्र. १ यांस रहिवाशी वस्तीमध्ये १० एच.पी.चे बेकायदेशीररित्या विदयुत कनेक्शन दिले. गैरअर्जदार क्र. ३ याने गैरअर्जदार क्र. १ चे वडील स्व. गंगाराव रामचंद्र वानखेडे यांचे नावाने विदयुत जोडणी दिली त्यांचा मृत्यु होवुन बरेच दिवस झाले तरीही मृत व्यक्तीच्या नावाची विदयुत जोडणी बंद केली नाही. गैरअर्जदार क्र. १ यास वाद परवाना देतांना गैरअर्जदार क्र. २ याने व गैरअर्जदार क्र. ३ याने अर्जदाराचे नाहरकत प्रमाणपत्र घेतले नाही. गावठाण्यामध्ये पिठ गिरणीला परवाना देत येत नसतांना गैरअर्जदार क्र. १ याने लघु उदयोग नियमांचे उल्लंघन करून गैरअर्जदार

क्र. १ यास पिठ गिरणी चालविण्याचा वाद परवाना दिला व गैरअर्जदार क्र. ३ याने गैरअर्जदार क्र. १ यांस लघु उदयोगासाइी सर्व नाहरकत प्रमाणपत्रे न घेता बेकायदेशीररित्या सुकळी ग्रा.पं. हद्दीत विदयुत जोडणी दिली. त्यांचे वायर जोडतांना अर्जदाराच्या घरावरून हलगर्जीपणाने नेले असे वाद विदयुत कनेक्शन गैरअर्जदार क्र. ३ याने गैरअर्जदार क्र. १ यास दिले. त्यामुळे वादग्रस्त परवाना व वादग्रस्त विदयुत कनेक्शन बेकायदेशीर अनाधिकाराने व चुकीने दिलेले असल्यामुळे व ते दोन्हीही परवाने व्हाईड असल्यामुळे रद्द करणे न्याय व जरूरी आहे.

६. वादीची अशी विनंती आहे की, या दाव्याचा निकाल लागेपर्यंत गैरअर्जदार क्र. १ यांस गैरअर्जदार क्र. २ याने वाद पिठगिरणी चालविण्यासाठी दिलेला परवान्यास एकतर्फी तात्पुरती स्थगीती दयावी. तसेच गैरअर्जदार क्र. १ यांस गैरअर्जदार क्र. ३ याने दिलेले वाद कनेक्शन या दाव्याचा निकाल लागेपर्यंत बंद ठेवावे असा एकतर्फी मनाई हुकुम दयावा व दाव्याचा निकाल लागेपर्यंत गैरअर्जदार क्र. १ याने वाद पिठगिरणी ईतर कोणत्याही साधनांद्वारे चालु ठेवु नये असा एकतर्फी तात्पुरता मनाई हुकुम दयावा.

७. सदर प्रकरणामध्ये प्रतिवादी क्र. १ याने त्याचा लेखी जबाब नि. २७ वर दाखल केला आहे. तसेच प्रतिवादी क्र. ३ याने त्यांचा लेखी जबाब हा नि. २४ वर दाखल केला आहे. सदर प्रकरणामध्ये प्रतिवादी क्र. २ ला दाव्याच्या संमसची बजावणी होवुन सुध्दा ते हजर राहीले नाही, त्यामुळे त्यांच्याविरूध्द एकतर्फी आदेश पारीत करण्यात आला.

८. प्रतिवादी क्र. १ यांनी त्याच्या लेखी जबाबामध्ये वादींची सर्व कथने नाकारलेली आहे. प्रतिवादी क्र. १ चे असे कथन केले आहे की, गैरअर्जदार क्र. १ यांना गैरअर्जदार क्र. २ यांनी दिलेल्या वैध परवान्यावरून

गैरअर्जदार क्र. १ यांचा पिठगिरणीचा व्यवसाय मौजे सुकळी येथे चालु आहे. तसेच गैरअर्जदार क्र. ३ यांनी सदर पिठगिरणीस लागणारा विदयुत पुरवठा पुरविण्यासाठी लागणारी विज यासाठी विदयुत कनेक्शन दिले आहे. गैरअर्जदार क्र. २ यांनी संपुर्ण कायदेशीर बाबींचे अवलोकन करून सदरील परवाना गैरअर्जदार क्र. १ यांना दिला आहे. गैरअर्जदार क्र. १ यांना सदर पिठगिरणीशिवाय इतर कोणताही व्यवसाय नाही. सदरील अर्जदार यांच्या मागणीनुसार जर वि. न्यायालयाने गैरअर्जदार क्र. १ यांची पिठगिरणी बंद करण्याचा निर्णय दिला तर गैरअर्जदार क्र. १ यांचेवर उपासमारीची वेळ येणे निश्चित आहे. याशिवाय मौजे सुकळी येथील ईतर लोकांना सुध्दा सदर पिठगिरणीशिवाय इतर कोणतीही पिठ गिरणी उपलब्ध नसल्याकारणाने १५ कि. मी. दुर येवुन पिठ दळुन न्यावे लागेल, तसेच गैरअर्जदार क्र. १ हे सन २०१० पासुन सदर पिठ गिरणीचा व्यवसाय करीत असतात.परंतु अर्जदार व गैरअर्जदार यांच्यामध्ये मागील एक ते दिड वर्षामध्ये होणा–या वादामुळे अर्जदार हा गैरअर्जदार क्र. १ यांचें विरूध्द वेळोवेळी वेगवेगळया कार्यालयामध्ये खोटे व बनावट अर्ज दाखल करून गैरअर्जदार क्र. १ याचे कसे व कोण्याप्रकारे नुकसान होईल हे बघत असतो.त्याच कारणामुळे अर्जदार यांनी सदरचा खोटा व बनावट दावा गैरअर्जदार क्र. १ यांचे विरूध्द दाखल केलेला आहे.

९. गैरअर्जदार क्र. १ चे पुढे असे कथन आहे की, दाव्याची पार्श्वभुमी पाहता प्रथमदर्शी दावा हा गेरअर्जदार क्र. १ यांच्या बाजुने पुर्ण झुकलेला आहे तसेच दाव्याचे पुरावे पाहीले असता दाव्याचा झुकाव हा गैरअर्जदार क्र. १ च्या बाजुने आहे हे निश्चीत होते. तसेच सन २०१० पासुन सदरील पिठ गिरणी चालु असतांनी सुध्दा अर्जदार यांचे कोणतेही नुकसान झाले नाही त्यामुळे आज रोजी सुध्दा अर्जदार यांचे सदरचा आदेश गैरअर्जदार

यांचेकडुन झाल्यास अर्जदार यांचे काहीही कोणतेही नुकसान होणार नाही परंतु सदरचा आदेश गैरअर्जदार यांचे विरोधात गेला तर गैरअर्जदार यांचेवर उपासमारीची वेळ येणे निश्चीत आहे. गैरअर्जदार क्र. १ चे पुढे असे कथन आहे की, अर्जदार हा जाणीवपुर्वक गैरअर्जदार यांचेवर वेळोवेळी खोटे व बनावट अर्ज देवुन खोटया केसेस दाखल करीत असतो. दि. ०४.०८.२०१८ रोजी सुध्दा अर्जदार यांनी गैरअर्जदार यांना एका खोटया तक्रारीमध्ये गुंतविले आहे.त्यामुळे अर्जदार हा कोणतेही कारण नसतांना खोटे अर्ज व खोटया केसेस दाखल करून गैरअर्जदार क्र. १ यांना त्रास देण्याच्या वाईट हेतुने सतत प्रयत्न करीत असतो. त्याचाच एक भाग म्हणुन सदरचा खोटा व बनावट दावा अर्जदार याने गैरअर्जदार क्र. १ यांचे विरूध्द केला आहे. तरी अर्जदार यांनी केलेला खोटा व बनावट दावा रद्द होणे न्याय व जरूरी आहे.

१०. प्रतिवादी क्र. ३ यांनी त्यांच्या नि. क्र. २४ च्या जबाबामध्ये वादीची सर्व कथन नाकारलेली आहेत. प्रतिवादी क्र. ३ चे असे कथन आहे की, प्रतिवादी क्र. ३ यांनी पिठ गिरणी चालविण्यासाठी प्रतिवादी क्र. १ यांना विदयुत कनेक्शन दिले आहे. प्रतिवादी क्र. ३ यांनी वादीस विदयुत जोडणी देतांना कायदयातील तरतुदींचे पालन केले नाही व रहिवाशी वस्तीमध्ये १० एचपी. चे बेकायदेशीररित्या विदयुत कनेक्शन दिले, हे वादीचे म्हणणे प्रतिवादी क्र. ३ यांनी नाकारलेले आहे. प्रतिवादी क्र. ३ चे असे कथन आहे की, प्रतिवादी क्र. ३ विरूध्ददाखल केलेला दावा हा मुदतीचे कायदयातील तरतुदींनुसार मुदतबाहय असल्याने तो खारीज होण्यास पात्र आहे. तसेच वादीची मागणी ही संपुर्णतः खोटी, बनावट, अनाधिकाराची, बेकायदेशीर व मुदतबाहय असल्याने प्रतिवादी क्र. ३ यांना मान्य नाही.

११. वादीतर्फे ॲड. ए.एस.टाकणखारे,मॅडम तसेच प्रतिवादीं क्र. १ तर्फे श्री. जी.जी.चंद्रवंशी, वकील, तसेच प्रतिवादी क्र. ३ तर्फे श्री.एस.पी. जैन,वकील यांचा युक्तीवाद ऐकला. पटलावरील कागदपत्रांचे अवलोकन केले. खालील मुद्दे निर्णयाकरीता उपस्थित होतात. त्या मुद्यांवरील कारण मिमांसा निष्कर्षासह पुढील प्रमाणे :—

| | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | प्रथमदर्शनी केस वादीच्या बाजुने असल्याचे वादीने सिध्द केले आहे काय? | ...नकारार्थी |
| २. | न्यायाचा समातोल वादीच्या बाजुने असल्याने वादीने सिध्द केले आहे काय? | ....नकारार्थी |
| ३. | मनाई हुकूम न दिल्यास वादीचे कधीही भरुन न येणारे असे नुकसान होईल, हे वादीने सिध्द केले आहे काय? | ....नकारार्थी |
| ४. | काय आदेश ? | .........अंतिम आदेशा प्रमाणे. |

## कारणमिमांसा

मुद्दा क्र. १ ते ३ करिता :—

१२. वादीने असे कथन केले आहे की, प्रतिवादी क्र. १ याची पिठ गिरणी वादीच्या घराच्या उत्तर बाजुला आहे. प्रतिवादी क्र. २ याने प्रतिवादी क्र. १ यास पिठगिरणी चालविण्याचा परवाना दिला आहे. प्रतिवादी क्र. ३ याने पिठ गिरणी चालविण्याचे विद्युत कनेक्शन दिले आहे. वादीचे कथन आहे की प्रतिवादी क्र. १ हा पिठ गिरणी चालवितांना मुंबई दुकान अधिनियमाचे उल्लंघन करीत असतो. वादीच्या कुटुंबास सतत पिठ गिरणीच्या आवाजामुळे त्रास होत असतो वादीच्या घरातील भांडे पडत असतात तसेच घराच्या भिंतींना भेगा

पडल्या. प्रतिवादीने पिठ गिरणीच्या धुराडयाची कुठलीही व्यवस्था केली नाही. त्यामुळे पिठाचा कचरा अर्जदार याच्या घरात येवुन अर्जदाराचे संपुर्ण कुटुंब आजारी पडले आहे. वादीला राहण्याची कुठलीही दुसरी पर्यायी व्यवस्था नाही. त्यामुळे वादीच्या कुटुंबाचे आरोग्य धोक्यात येत आहे. प्रतिवादी क्र. २ व ३ यांनी वादीस पिठ गिरणीचा परवाना देतांना तसेच विदयुत जोडणी देतांना कायदयाचे पालन केलेले नाही. वस्तीमध्ये १० एच.पी.चे कनेक्शन देता येत नसतांना प्रतिवादी क्र. ३ यांनी प्रतिवादी क्र. १ यांस १० एच.पी.चे बेकायदेशीर रित्या विदयुत कनेक्शन दिले. प्रतिवादी क्र. ३ याने प्रतिवादी क्र. १ चे वडील स्व. गंगाराम वानखेडे यांच्या नावाने विदयुत जोडणी केली. त्यांचा मृत्यु होवुन बरेच दिवस झाले तरीही प्रतिवादी क्र. ३ ने मृत व्यक्तीच्या नावाची विदयुत जोडणी बंद केली नाही.

१३. वादी यांचे वकिलांनी खालील न्यायनिर्णयाचा आधार घेतला.

*In case of Executive Engineer,Southern Electricity Supply Company of Orissa Ltd. (Southco) and another..vs.. Sri Seetaram Rice Mill, reported in 2012(3)Mh.L.J.page no. 537*. In which their Hon'ble Lordships held that,

"Section 135 of the 2003 Act deals with an offence of theft of electricity and the penalty that can be imposed for such theft. This squarely falls within the dimensions of Criminal Jurisprudence and mens rea is one of the relevant factors for finding a case of theft. On the contrary, section 126 of the 2003 Act, does not speak of any criminal intendment and is primarily an action and remedy available under the civil law. It does not have features or elements which are traceable to the criminal concept of mens rea. Thus, it would be clear that the expression unauthorized use of electricity under section 126 of the 2003 Act deals with cases of unauthorized use, even in absence of intention".

वरील न्यायनिर्णयाचे अवलोकन केले. सदर न्यायनिर्णयात नमुद केलेले गुणोत्तर प्रस्तुत केसमधील कथनांच्या अनुषंगाने विचारात घेणे आवश्यक आहे.

१४. वादी यांनी या अर्जामध्ये अशी विनंती केली आहे की, दाव्याचा निकाल लागेपर्यंत प्रतिवादी क्र. १ यास प्रतिवादी क्र. २ याने दिलेल्या परवान्यास तात्पुरती स्थगीती मिळावी. तसेच प्रतिवादी क्र. १ यांस प्रतिवादी क्र. ३ यांनी दिलेले वाद कनेक्शन दाव्याचा निकाल लागेपर्यंत बंद ठेवावे व प्रतिवादी क्र. १ यांनी दाव्याचा निकाल लागेपर्यंत वाद मिळकत कोणत्याही साधनाद्वारे चालु ठेवु नये. वादी यांनी प्रस्तुत दाव्यामध्ये लोकशाही दिन तक्रार अर्ज दि. ०२.०४.१८ रोजी जिल्हाधिकारी यवतमाळ यांच्याकडे लोकशाही दिन तक्रार अर्जाची प्रत दाखल केली आहे. त्या अनुषंगाने तहसिलदार उमरखेड यांनी ग्रामविकास अधिकारी ग्राम पंचायत सुकळी यांना दिलेले पत्र दाखल केलेले आहे. तसेच वादी यांनी तहसिलदार यांच्याकडे दिलेला अर्जाची प्रत दि. १९.०३.२०१८ ची दाखल केलेली आहे. तसेच वादी यांनी कार्यकारी अभियंता ग्रामीण सुकळी यांच्याकडे दिलेल्या अर्जाची प्रत दाखल केलेली आहे. प्रतिवादी क्र. १ यांच्या विरूध्द तहसिलदार उमरखेड यांच्या समोर दिलेल्या अर्जाची प्रत दाखल केली आहे. तसेच पोलीस ठाणेउमरखेड येथे वादी यांनी प्रतिवादी विरूध्द दिलेल्या तक्रारीची प्रत दाखल केलेली आहे. यावरून वादी यांनी सक्षम अधिका—यांकडे वाद पिठ गिरणी बंद होण्याबाबत तसेच वाद पिठ गिरणीचे विदयुत कनेक्शन बंद होण्याचे तक्रार अर्ज दिल्याचे दिसुन येत आहे. प्रतिवादी यांनी ग्रामपंचायत कार्यालय सुकळी यांच्या दि. २९.१२.२०१८ च्या प्रोसिडींग रजिष्टर ठरावाची सत्य प्रत दाखल केली आहे. त्यामध्ये असे नमुद केले आहे की, ‘‘ आज रोजी सभेत सुचकांनी सुचवल्याप्रमाणे गंगाराम रामचंद्र वानखेडे हे मयत असुन त्यांच्या नांवे पिठाची चक्कीचे कोटेशन होते व ते

त्यांच्या स्वत:च्या मालकीच्या जागेत होते. पण काही कारणास्तव ही चक्की स्थलांतरीत करून थोडीशी म्हणजेच ५ ते ६ फुट (अंकांमध्ये खाडाखोड दिसुन येते) दुर करण्यासाठी ग्रा.पं. ची नाहरकत देण्यावर चर्चा झाली व चर्चेअंती सर्वानुमते ठराव संमत झाला''.

१५. वादीने देखील दि. २९.१२.२०१८ रोजीच्या ग्रामपंचायत सुकळीच्या प्रोसिंडींग रजिष्टर ची ठराव प्रत दाखल केली आहे व त्यामध्ये खालीलप्रमाणे नमुद केले आहे.

''आज रोजी सभेत सुचकांनी सुचवल्याप्रमाणे अनंता गंगाराम वानखेडे यांची पिठाची गिरणी स्थलांतरीत करण्यावर चर्चा झाली व चर्चेअंती अंदाजे १०० ते १५० फुटावर पिठाची चक्कीचे स्थलांतर करण्याकरीता कोणतीही ग्र.पं.हरकत नसल्याचे ठरले व ठराव देण्याचे ठरले''.

१६. वादी व प्रतिवादी यांनी दाखल केलेल्या सदर प्रोसिडींग रजिष्टरच्या उता–यांमध्ये तफावत दिसुन येते. वादी यांनी नि. १ मध्ये केलेली विनंती व तात्पुरत्या मनाई अर्जात केलेली विनंती ही सारखीच असल्याने वादीने विनंती केल्याप्रमाणे तात्पुरता मनाई हुकुम दिल्यास अंतिम मनाई हुकुम दिल्यासारखे होईल. प्रतिवादी क. १ च्या विधीज्ञांनी युक्तीवादादरम्यान कथन केले आहे की, सक्षम अधिका–यांनी पिठ गिरणी बाबत दिलेलया आदेशांची प्रतिवादी हा पालन करीत आहे व त्याप्रमाणे उपाययोजना करण्याचा प्रयत्न करीत आहे. वादी यांनी दिलेल्या तकार अर्जावरून संबंधीत खात्याचे सक्षम अधिकारी यांनी दखल घेवुन प्रतिवादी उपाययोजना करण्याबाबत सुचना दिलेल्या सकृत दर्शनी दिसुन येतात. त्यामुळे वादी यांस सकृत दर्शनी केस नाही,न्यायाचा समतोल वादीच्या बाजुने नाही तसेच तात्पुरता मनाई हुकूम न दिल्यास वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. त्यामुळे मुद्दा क. १ ते ३ चे उत्तर मी नकारार्थी

देत आहे.

<u>मुद्दा क्र. ४:</u>

१७. वर चर्चेलेली कारणमिमांसा व मुद्दा क्र. १ ते ३ यांना दिलेले उत्तराच्या अनुषंगाने मी मुद्दा क्र. ४ च्या उत्तरादाखल, खालील आदेश पारीत करीत आहे.

<u>आदेश</u>

१.वादीचा नि.. क्र. ५ येथील अर्ज नामंजुर करण्यात येतो.

२..अर्जाचा खर्च दाव्याच्या न्यायनिर्णयावर अवलंबुन आहे.

स्वा/—

(श्रीमती एस.एस.जाधव)
दिवाणी न्यायाधीश क.स्तर.
उमरखेड दि. ११.०२.२०१९